# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१७८/२०१५ मधील
# निशाणी क्र.८८ वर आदेश

**CNRNO.MHLA110007822018.**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.६ ने विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादी हा हरीनाम सप्त्यामुळे बाहेरगावी असल्यामुळे मुदतीमध्ये प्रकरणामध्ये हजर होऊन कैफियत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे सदर प्रतिवादीविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश बाजूस सारुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याची सदर प्रतिवादीने विनंती केली आहे.

२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रकरणामध्ये वादीने पुरावा दिल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावे असे वादीने मागणी केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादी क्र.६ हे प्रकरणामध्ये दि.१९/१०/२०१५ रोजी हजर झालेले असुन सदर प्रतिवादींनी मुदतीमध्ये कैफियत दाखल केलेले नाही. सदर अर्जाच्या कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदर प्रकरणातील वादीचा पुरावा संपलेला असुन प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरिता प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच प्रकरण सन २०१५ पासुन प्रलंबित असुन सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. सदरचा दावा वादीने मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल केलेला

असल्यामुळे पक्षकारांमधील वादाचे निराकरण गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास होणारा विलंब विचारात घेऊन प्रतिवादीवर खर्च बसवुन प्रतिवादीला बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज सदर प्रतिवादींवर खर्च बसवून मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.८८ वरील अर्ज प्रतिवादी क्र.६ वर रक्कम रु.२५००/- खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.६ यांनी वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

स्वा/-

दि. ०६.०३.२०१९.

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : M.N. Yenge
Name of the Court : Jt. C.J.S.D Court
(Shivkant M. Gourgond)
Date of Judgment/Order : 06.03.2019
Judgment/Order signed by presiding officer : 06.03.2019
Judgment/Order uploaded on : 07.03.2019